महाराष्ट्र शासन

प्रवेश नियामक प्राधिकरण

८वा मजला, न्यु. एक्सलसियर बिल्डींग,
ए.के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१

दूरध्वनी : ०२२ - २२०१ ६१५९

वेबसाईट : http://www.maha-ara.org
ईमेल : maharashtra.ara@gmail.com


क्र. संकीर्ण/प्र.नि.प्रा/प्र.प्र.प.का/१६७२/ २०१८ दिनांक २७ /११/२०१८

## सूचना

**विषयः- शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील प्रवेश प्रक्रिया पडताळणीचे कामकाज संगणकीकृत प्रणालीने करण्याबाबत.**

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील प्राधिकरणाकडील प्रवेश प्रक्रिया पडताळणीचे कामकाज बाहयस्त्रोताकडून करुन घेण्याची कार्यवाही सुरु आहे. प्रवेशित विद्यार्थ्यांची उपलब्ध कागदपत्रांची संगणकीकृत तपासणी प्रगतीपथावर आहे. दि. ०१/१२/२०१८ पासून सर्व महाविद्यालयात प्रवेशित विद्यार्थ्यांच्या उपलब्ध कागदपत्रांची प्रत्यक्ष छाननी बाहय स्त्रोतामार्फत करण्यात येईल. याबाबतचा विस्तृत तपशिल लवकरच प्रसिध्द करण्यात येईल.

तपासणी दरम्यान विद्यार्थ्यांच्या प्रवेशासंदर्भात त्रुटी आढळल्यास संस्थेने त्या संबंधित संचालनालयांमार्फत त्रुटींची पूर्तता करावी. बाहयस्त्रोतातील कर्मचारी हे प्राधिकरणाचे प्राधिकृत अधिकारी/कर्मचारी असतील. तरी संबंधित संचालनालय व संस्था महाविद्यालयांनी त्यांना संपूर्ण सहकार्य करावे. प्रत्यक्ष छाननी झाल्यानंतर प्राप्त झालेला अहवाल प्राधिकरणाच्या बैठकीत मंजूर करण्यात येईल व त्यानंतरच प्रवेशित विद्यार्थ्यांचा प्रवेश नियमित झाल्याचे समजण्यात येईल याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

(आ.ए.रायते) भा.प्र.से.
**सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण,मुंबई**

D:\rutuja\Rutuja\Malekar Sir\kalp tech notice 26-11-2018.docx